# महानगरपालिका शिक्षण विभाग, नाशिक

## इंग्रजी माध्यम शाळेसाठी मानधनावरील शिक्षक भरती

## WALK IN SELECTION (वॉक इन सिलेक्शन)

### जाहिरात

नाशिक महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत कायम विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या इंग्रजी माध्यम शाळांसाठी रु.6000/- ( अक्षरी रुपये सहा हजार मात्र) मानधनावर, शिक्षक भरती करावयाची असल्याने खाली नमुद केलेली अर्हता धारण करणाऱ्या,अटीची पुर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील वैयक्तीक माहिती पत्रासह (Bio Data) तसेच सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रति व छायांकीत प्रतिंसह खालील नमुद केलेल्या ठिकाणी व दिनांक दिवशी मुलाखतींसाठी हजर रहावे.

**मानधनावरील शिक्षक( इंग्रजी माध्यम ) रिक्त जागा (आरक्षणासह)**

| अ.न. | संवर्गाचे नांव | रिक्त पदे | अजा | अज | विजा/भज | | | | इमाव | विमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | | | |
| 1 | उपशिक्षक | 12 | 2 | - | 1 | 1 | 1 | - | - | - | 7 | 12 |

**<u>शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता आणि अटी शर्ती:-</u>**

1) मान्यताप्राप्त मंडळाची किमान 50 टक्के गुणांसह उच्च माध्यमिक परिक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेची/मंडळाची प्राथमिक शिक्षण शास्त्र दोन वर्षाची पदवीका (डी.टी.एड.) इंग्रजी माध्यमातून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
2) WALK IN SELECTION (वॉक इन सिलेक्शन) मध्ये निवड झालेल्या उमेदवारांनी शासन ज्या वेळी शिक्षक पात्रता परीक्षेचे (टी.ई.टी) आयोजन करेल त्या परीक्षेला प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.
3) उमेदवारांनी एस.एस.सी. किंवा उच्चत्तम परीक्षा या मध्ये किमान 100 गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
4) MSCIT परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
5) निवडीचे निकष सदर पदांच्या प्रवेश नियमानुसार विहीत केलेली अर्हता/ अटी धारण करीत असलेल्या उमेदवारांमधून उमेदवाराने डी.एड./डी.टी.एड. (इंग्रजी माध्यम) लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे निवड यादी तयार करण्यात येईल. गुण समान असल्यास जन्म दिनांकातील वयोजेष्टतेनुसार प्राधान्य क्रम देणेत येईल. अध्यापनाचा पूर्वानुभव असल्यास त्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
6) **उमेदवाराने उपस्थित राहण्याचे ठिकाण महानगरपालिका शाळा क्र. 16 पोलीस हेडक्वार्टर गंगापूररोड, नाशिक दिनांक 10/08/2017 वेळ 11.00 वाजेपर्यंत उपस्थित असणाऱ्या उमेद्वारांचीच मुलाखत घेतली जाईल.**

**<u>सर्व साधाराण अटी:-</u>**

1) जाहिरातीत नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बदल होऊ शकतो.
2) विजा (अ) भज (ब) भज (क) भज (ड) या प्रवर्गाकरीता विहीत केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परीवर्तनिय आहे.
3) रिक्त पदाची उपलब्धता आणि आवश्यकतेनुसार नेमणूका केल्या जातील,तथापी निवड यादी कोणत्याही वेळी पूर्व सुचना न देता रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.
4) वैयक्तीक माहिती (बॉयोडेटा) स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने परीपुर्ण असावेत. विहीत नमुन्यात नसलेल्या व वैयक्तीक माहिती अपूर्ण असलेले अर्ज फेटाळण्यात येतील.
5) पत्र व्यवहाराचा पत्ता पूर्ण व सुस्पष्ट असावा.
6) अर्ज माहितीपत्रकासाठी वापरण्यात येणारे कागद ए फोर (A4) आकारातील असावेत.
7) वैयक्तीक माहितीपत्रक संगणकावर संकलीत करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराने त्याचे नांव, जन्म तारीख, पत्ता व सांख्यिकी माहिती इंग्रजी भाषेत ठळक अक्षरात (CAPITAL LETTERS) लिहिणे आवश्यक आहे.
8) उमेदवार अंध, अपंग असल्यास त्याबाबत सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सोबत जोडावी.
9) उमेदवाराने आवश्यक प्रामणपत्राच्या मूळ प्रति व साक्षांकित प्रतिसह उपिस्थित राहावे.
10)मागास प्रवर्गातील उमेदवाराना नियुक्ती दिनांकापासुन 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
11) इतर राज्यातुन महाराष्ट्र राज्यातस्थलांतरीत झालेल्या मागासवीर्गीय उमेदवाराचा आरक्षीत पदासाठी विचार केला जाणार नाही.
12) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या एक महिन्याच्या मानधनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल अथवा तशा आशयाचे करारपत्रसादर करावे लागेल.
13) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळी रु 100/- च्या स्टॅम्प पेपरवर एक वर्षाचा करार लिहून दयावा लागेल त्याचा खर्च उमेदवाराने स्वत: करावयाचा आहे.
14) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारी/ नियुक्ती रद्य करण्यात येईल.
15) उमेदवाराने कोणत्याही टप्प्यावर भरती यंत्रणेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे आढळल्यास त्यांना निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
16) सदरचे पद कायम स्वरुपाचे नसल्याने केवळ तात्पुरते स्वरुपाचे असल्याने कायम स्वरुपी हक्क सांगता येणार नाही. याचे हमीपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.
17)सदरची नेमणूक हि फक्त २०१७-१८ ह्या शैक्षणिक वर्षा करिता असेल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
18) उमेदवाराने भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

Sd/-

**शिक्षणाधिकारी,**

**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**

# अर्जाचा नमुना

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी,

मनपा शिक्षण विभाग,नाशिक

1) उमेदवाराचे पुर्ण नांव ---------------------------------------------

2) उमेदवाराचे पुर्ण नांव(IN BLOCK CAPITAL LETTERS)---------------------------------------------

3) पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता ------------------------------------------

------------------------------------------

फोन नंबर/मोबाईल नंबर ------------------------------------------

4) जन्म तारीख अंकातव अक्षरी : / / (अक्षरी : ----------------------------------------)

5) प्रवर्ग (जात):- ---------------------

**<u>शैक्षणिक अर्हता:-</u>**

| अ.न. | अर्हता | परिक्षेचे नाव | बोर्ड/मंडळाचे नांव | उत्तीर्ण वर्षे | शे. गुण/श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

6) कामाचा अनुभव:-

**7) अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची यादी**

1) -------------3) -----------

2) -------------4) ------------

**टिप:-** प्रमाणित करतो/ करते की या अर्जात नमुद केलेली सर्व माहिती खरी असुन ती खोटी/ चुकिची असल्याचे आढळुन आल्यास अपात्र समजून पुढील कार्यवाहिस पात्र राहील.

स्थळ :-

दिनांक :-

उमेदवाराची स्वाक्षरी

नांव ---------------------